International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# एक अपत्य असलेल्या कुटुंबातील कशोराचे पालक-बालक संबंध- एक अध्ययन

कु. रूपाली सुभाषराव कणसे

सहा. प्रा. गृहअर्थशास्त्र, जिजामाता कला महा वद्यालय दारव्हा जि. यवतमाळ

गोषवारा

भारत देश हा संपूर्ण जगामध्ये तरुण देश म्हणून ओळखला जातो. कारण आपल्या देशामध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. हा तरुण मान सकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या, भावनिकदृष्ट्या परिपक्व, सशक्त व सुदृढ असेल तर आपल्या देशाचा वकास अ धक जोमाने व्हायला सुरुवात होईल .ज्या देशाची पढी सशक्त असते, त्या देशाचा वकास कोणीच रोखू शकत नाही. राष्ट्रसंताच्या संस्काराचा वारसा लाभलेली आपली भारतभूमी आज तरुणांच्या बळावर महासत्ता होण्याची स्वप्न पाहत आहे. परंतु ढासळलेली नैतिकता संस्काराचा अभाव, वाढती गुन्हेगारी, हिंसक प्रवृत्ती, आक्रमकता इत्यादी बाबींमुळे राष्ट्राची खरी असलेली साधन संपत्ती म्हणजेच ही युवा पढी युवाशक्ती ही ध्येयहीन अ वचारी, असंवेदनशील होत चालली आहे. त्यामुळे त्याचे दूरगामी दुष्परिणाम भेडसावत आहे आ ण म्हणून हल्लीची पढी त्यांचे अनेक प्रश्न समस्या, गुन्हेगारी प्रवृत्तीचा त्यांच्या कारणांचा अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रस्तावना

कुटुंब म्हणजे परस्पराशी नाती असलेल्या माणसाचा समूह. कुटुंब मुख्यतः रक्तासंबंधी नात्यांनी बनलेले असते व सर्व व्यक्ती एकमेकांशी भावनिक बंधाने बांधलेली असतात यामध्ये सर्वात जास्त जवळचा संबंध मातेचा आपल्या नवजात बालकांशी असतो हा असा दृढ संबंध निसर्गानेच जोडून दिला आहे .कारण नऊ महिन्यापर्यंत आपल्या गर्भामध्ये वाढत असलेल्या बाळाचा जन्म झाल्यावर तिला त्याच्याबद्दल नितांत आत्मीयता वाटते जनु नुकताच जन्मलेले नवजात शशु हा तिच्या शरीराचा एक अ वभाज्य अंग होय .असे वाटते तसेच पत्याला देखील आपल्या आपत्याबद्दल प्रेम वाटते. कारण या शशूच्या जन्मास पत्याचे बीज कारणीभूत असते.

पालक व माता- पता यामध्ये फरक आहे माता पता हे जन्मदाते असतात तर पालक हे बालकाचे पालनपोषण करणारे इतर व्यक्ती असू शकतात .

आजच्या युगात अनेक क्रांतिकारक बदल होत चालले आहे. त्यापैकी एक म्हणजे कुटुंब कुटुंबाची भावनिक दृष्टिकोनातून निरोगी स्वरूप बदलत चालले आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी होऊन एकत्र कुटुंब पद्धती कडून वभक्त कुटुंब पद्धतीकडे संक्रमण होत चालले आहे.दुसरा महत्वाचा बदल म्हणजे ववाहाचे स्वरूप होय .आजच्या काळात ववाहाचे पूर्वीप्रमाणे महत्त्व, पा वत्र्य राहिलेले नाही. पती-पत्नी संबंधाचे स्वरूप बदलले त्याचा परिणाम कशोरांच्या समस्या वाढत आहे. मुलांच्या सर्वांगीण वकासाच्या लांब पल्ल्याच्या प्रवासात संरक्षक व मार्गदर्शक या दोन्ही भू मका पालकांना पार पाडायच्या असतात .तसे झाले नाही तर मुले समस्यात्मक वर्तन करतात, बिघडतात, समाज वघातक कृत्य करतात, असामाजिक बनतात

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

असे वर्तन मुलांमध्ये आढळून येते. त्यामुळे सामाजिक दृष्टिकोनातून मुलांच्या सर्वांगीण वकासासाठी कुटुंब संस्था ही महत्त्वपूर्ण आहे.

समाजाचे सातत्य टिक वण्यासाठी प्रत्येक घटक जाणीवेने कार्य करत असतो. सामाजिक व्यवस्थेला टिकवून ठेवणारा मजबूत कणा म्हणजे कुटुंब होय. त्याचे वस्तृत स्वरूप म्हणजे गाव आ ण गावाचे तालुका आ ण तिथून पुढे जिल्हा ,राज्य आ ण देश होय .मात्र याचा मूलभूत घटक हा कुटुंब होय .आ ण या कुटुंबाचा महत्त्वपूर्ण असलेला घटक म्हणजे कशोर. त्यावरच आपल्या देशाचा वकास अवलंबून आहे.

आजच्या काळात सामाजिक बदल होत चालले आहे .त्यामध्ये पूर्वीच्या काळी असणारी संयुक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण कमी होऊन वभक्त कुटुंब आपल्याला दिसून येते . वभक्त कुटुंबामध्ये पती पत्नी , मुलगा मुलगी असे वभक्त कुटुंबाचे स्वरूप दिसून येते.परंतु आधुनिक युगामध्ये वभक्त कुटुंब पद्धती मधूनही कुटुंब व्यवस्थेचे हे चत्र बदललेले दिसून येते. कुटुंबातील सदस्य संख्येचे प्रमाण अत्यल्प कमी झाल्याचे दिसून येते .त्यामध्ये आता एक अपत्य असलेली कुटुंबे पहावयास मळते. याचे प्रमाण ग्रामीण भाग व शहरी भाग दोन्ही ठिकाणी जास्त असल्याचे दिसून येते .वाढती महागाई कुटुंबाचा आ र्थक प्रश्न ,कुटुंबाच्या जबाबदाऱ्या नको , नवीन ट्रेड ,आई वडील नोकरीवर, त्यामुळे एक अपत्य असलेल्या कुटुंबातील कशोरांच्या पालक-बालक संबंधावर अध्ययन होणे आवश्यक आहे.

कीवर्ड - एक अपत्य असलेली कुटुंबे. कशोर, पालक-बालक संबंध

कोणतेही संशोधन कार्य करताना प्रथम संशोधनाशी संबं धत कार्याचे उद्दिष्ट स्पष्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे संशोधन प्र क्रयेला गती प्राप्त होते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

1] कशोरावस्थेतील बदलत्या पालक-बालक संबंधाची कारणे जाणून घेणे.

2] एक अपत्य असलेल्या कुटुंबातील कशोरांचे पालक-बालक संबंध अभ्यासणे

3] माहिती तंत्रज्ञान युगाचा एक अपत्य असलेल्या कुटुंबातील कशोरांवर पालक-बालक संबंधावर होणारा परिणाम अभ्यासणे.

एकुलते एक मुल हे पालकाच्या वश्वाचे केंद्र असते. एकूलत्या एक मुलाचे संगोपन करणे हे आज पालकांसमोर एक आव्हान आहे. पालक एकुलत्या एक मुलांकडून सुपर चाइल्ड होण्याच्या अपेक्षा व्यक्त करतात. तसेच एकल मुले मला जे हवे आहे ते मला नेहमीच मळते या मान सकतेमुळे त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात या सर्व परिस्थितीचा परिणाम पालक-बालक संबंधावर होतो.

परिभाषा

माहिती तंत्रज्ञान युग

सध्याचे युग हे संगणकाचे युग म्हणून ओळखले जाते. माहिती तंत्रज्ञान म्हणजे योग्य अशी माहिती इंटरनेटच्या माध्यमाने पोहोच वणे.

पालक

जे आई वडील मुलांना जन्म देतात मुलांचे पालन पोषण करतात मुलांना वाढवतात, संरक्षण आ ण मार्गदर्शन करतात ते पालक.

कुटुंब

एक समुदाय जेथे कुटुंब एकत्र राहतात एक  कंवा अ धक पालकांचा एक गट आ ण त्यांची मुले एकक म्हणून एकत्र राहतात. रक्त  कंवा  ववाहाद्वारे एकमेकांशी संबं धत लोकांचा गट.

एकल मुले

एकुलते एक मुले म्हणजे ज्यांना बहिणी  कंवा भाऊ नाहीत .एकुलता एक मुलगा ही अशी व्यक्ती असते ज्याला कोणीही भावंड नसतात.

 कशोरावस्थेचा कालखंड हा वय वर्षे 12 ते 19 पर्यंत समजला जातो, परंतु मुला-मुलींमध्ये ही अवस्था लवकर यायला लागली आहे. म्हणजेच शारीरिक बदल, शारीरिक परिपक्वता ही वेळेच्या आधी लवकर येत आहे .या अवस्थेमध्ये जे शारीरिक बदल होतात त्यावरून या अवस्थेला वादळी व अशांततेचा कालखंड म्हटले जाते. या वयोगटातील मुला मुलींच्या पालकांकडून तक्रारी वाढलेल्या आहेत. मुलांची  चड चड, तणावग्रस्त,  चडून अंगावर येणे, मोबाईल, टीव्ही मध्ये गुंतून राहणे, कुणाशीही न बोलणे, एकटे राहणे, अशा अनेक तक्रारी बालकांच्या एक अपत्य असलेल्या कुटुंबातील  कशोरांच्या संदर्भात पालक सांगताना दिसतात. पौगंडअवस्थेची वै शष्ट्ये लक्षात घेतांना या अवस्थेत होणारे महत्त्वाचे लैं गक बदल आ ण त्यांचे अनुषं गक असे भावनिक, शारीरिक व सामाजिक परिणाम होणे हे पौगंडअवस्थेचे स्वरूप आहे. या अवस्थेचे लैं गक परिपक्वता ही वै शष्ट्य आहे.परंतु लैं गक बाबी संबंधी उत्तर बालव्यवस्थेच्या मध्यापासून होणारी प्रचंड उत्कंठा या वषयी आपल्याला कोणीतरी सांगावं असं त्यांना वाटतं, परंतु एक अपत्य असलेल्या कुटुंबामध्ये ह्या गोष्टी शेअर करायला, संवाद साधायला कोणीही नसतो .याउलट मुलांवर अनेक नियम, शस्तीच्या आधारावर बंधने घातली जातात. त्यामुळे मुलांचे पाऊल वाकडे पडते. काही मुले गुन्हेगारीकडे वळतात, काहींना लैं गक बाबी संबंधी ,घृणा निर्माण होते. या अवस्थेत  कशोर गोंधळलेला दिसून येतो आ ण समस्यांची कारणे शोधली तर या अवस्थेमध्ये जे शारीरिक बदल होतात, अंतस्रावी ग्रंथी मधून स्त्रवणारे स्त्राव कमी-अ धक प्रमाणामध्ये स्त्रवणे इत्यादीमुळे मुलांचा शारीरिक समतोल बिघडतो. या अवस्थेत होणाऱ्या शारीरिक बदलाचा परिणाम मान सक वर्तनात होतो आ ण हाच काळ एक अपत्य असलेल्या कुटुंबातील  कशोरांच्या पालक-बालक संबंध बदलाला कारणीभूत ठरतो आ ण तिथून पालक आ ण  कशोर यांच्या संबंधात दुरावा निर्माण होण्याला सुरुवात होते. मुलांच्या मनामध्ये मान सक संघर्ष निर्माण होतो. परंतु पालकांच्या व्यस्ततेमुळे पालकाकडून मुलांना योग्य बाबीचे ज्ञान पुरवल्या जात नाही. मुलांना समजून घेणे, वेळ देणे गरजेचे आहे. आजचे जीवन अस्थिर आ ण धावपळीचे झाले आहे. त्यामुळे पालकांना मुलांना देण्यासाठी वेळ नसतो.

आज आपणवैश्विक नागरिक बनत चाललोय इंटरनेट मुळे सगळ्या जगाला जोडले गेले. पण आपण आपल्या पुरतेच संकु चत झालो .आज पालकांना मुलांकडे बघायला मुलांची संवाद साधायला वेळ नाही. आई-वडील इतके व्यस्त झालेत की, मुलांशी गप्पा मारायला वेळ नाही. एक अपत्य असलेल्या कुटुंबामध्ये इतर सदस्यही नसतात. त्यामुळे  मुलांना  संवाद साधायला दुसरे कोणीही नसते त्याचा दुष्परिणाम एकटेपणा, एक्कलकोंडेपणा, मान सक आरोग्य बिघडणे, अयोग्य बाबींकडे वळने अशा बाबी दिसून येतात.

पूर्वीच्या काळी घरात संस्कार करणारी आजी आजोबा असायची आता  वभक्त कुटुंब पद्धतीमुळे  एक अपत्य कुटुंबामध्ये मुलांना घरात प्रेम, माया, वेळ देणार माणूसच कमी झालेला आहे. आई-बाबा असले तरी ते सतत घाईत  कंवा कामाच्या व्यापात असतात. मग मुले बोलायला लागली की, त्यांना गप्प केले जाते .मुलांशी

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

बोलणं होमवर्क पुरतच असेल तर मुले व्यक्त कधी होणार दुसरं म्हणजे पालकच कामाच्या अतितानामुळे सतत तणाव ग्रस्त राहतात तर तो तणाव घरामध्ये मुलांशी बोलताना व्यक्त होतो पालकच जर मुलांसोबत हिंसक रीतीने व्यक्त होत असतील तर मुलंही तेच शकतात आ ण हिंसक पद्धतीने व्यक्त होण्यात काहीच गैर नाही .अशी त्यांची धारणा होते. त्यांचं हरवलेलं बालपण त्यांची हरवलेली वचारशक्ती जागेवर आणण्याची आज संपूर्ण समाजामध्ये कुठेही व्यवस्था नाही.

आज माहिती तंत्रज्ञान युगामुळे कशोरांमध्ये अनेक बदल झालेली दिसून येतात. टीव्ही मोबाईल, फॅशन तसेच जाहिरातीचा कशोरांच्या राहणीमानावर प्रभाव दिसून येते. त्या अनुषंगाने पालकांकडून आ ण बहुतेक वस्तूच्या अपेक्षाही केल्या जातात. आधीच्या काळात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. आज आपणास एक अपत्य कुटुंब पद्धती पहावयास मळते. संयुक्त कुटुंबातील सदस्य व ज्येष्ठ मंडळी मुलांना न कळत अनेक बाबी मुलांमध्ये रुजवायचे कशोर वयात मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक बदलाच्या संदर्भात ,त्याच्या सर्वांगीण वकासाच्या दृष्टिकोनातून वेळोवेळी प्रत्येक बाब समजून सां गतली जात असे .नैतिक मूल्य ,संस्कार, योग्य सवयी, मुलांमध्ये रुज वल्या जायच्या मुलांच्या भोवती गरजांना अवास्तव महत्त्व दिले जात नव्हते. आई व डलांसोबत एकंदरीत कुटुंबासोबत अ धक वेळ घालवला जाईल मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक बदलाचा त्याच्या मान सक वर्तनावर होणारा परिणाम यासंदर्भात वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले जायचे. समजून सां गतले जात असे. पालकां वषयी कशोर यांच्या मनात मनात आदर युक्त भीती असायची परंतु आता एक अपत्य असलेल्या कुटुंबामध्ये आदरयुक्त भीती फार कमी प्रमाणामध्ये दिसून येते. मुलांच्या संगोपनाच्या दृष्टिकोनातून एक अपत्य असलेले कुटुंबातील पालक यांच्यामध्ये बऱ्याच फरक दिसून येते. परिस्थिती बदलली परंतु त्यानुसार पालक बदललेली दिसून येत नाही. आधुनिक काळात मुलांच्या व्यक्तिमत्व वकासाच्या दृष्टिकोनातून एक अपत्य असलेल्या कुटुंबातील पालकांची प्रयत्न अपुरे पडतात. आजचे जीवन अस्थिर धावपळीचे झाले आहे .त्यात मुलांशी संवाद साधने, चर्चा होणे, मुलांना वेळ देणे गरजेचे आहे .तेव्हा कशोरावस्थेतील मुलांचा मान सक समतोल सांभाळला जाऊ शकतो. त्यामुळे मुलांना वेळ देणं,संवाद साधने अत्यंत गरजेचे आहे.

सारांश

आज जुन्या काळातील सामाजिक संस्था आता नव्या काळानुसार परिवर्तित होत आहे .माणसाच्या जीवनात सामाजिक संस्था महत्वाची भू मका बजावते यामध्ये सर्वात महत्त्वाची भू मका असणारी कुटुंब संस्था पार बदलली आहे. जीवनमूल्य ही कुटुंब संस्थेतून मळते. आता कुटुंबाची व्याख्या बदलत चालली आहे. शहरी भागात हा बदल जाणवत असताना आता ग्रामीण भागातही ही कुटुंबात वभक्त कुटुंब पद्धती एक अपत्य असलेली कुटुंब संख्या वाढत आहे. मुलाबाळांना पाहिजे तसा द्यावा असा वेळ मळत नाही. नातवंडांना आजी आजोबा कडून संस्कार मळत नाही. मोबाईल हातात आला तेव्हापासून संवाद हरपला आहे. परिणामी नव्या पढीला कुटुंब आ ण समाजाप्रती आदर प्रेम जिव्हाळा नसल्यासारखा झाला आहे. यातून समाज स्वास्थ बिघडत चालले आहे. ववाह संस्था कुटुंब संस्था, शक्षण संस्था यामध्ये प्रामुख्याने परिवर्तन झाले म्हणून माणसाचे जीवनमान बदलले आहे. त्याचे दुष्परिणाम एक अपत्य असलेल्या कशोरांच्या समस्याचे प्रमाण ,अनेक तक्रारी वाढले आहेत. त्या उद्देशाने या वषयावर अध्ययन होणे, लक्ष केंद्रित होणे गरजेचे आहे.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

संदर्भग्रंथ

1. डॉ. सबाने सुजाता, बळवंत कांबळे प्रया, डॉ.भुईभार सीमा ,मानव वकास- गृहअर्थशास्त्र, साई ज्योती
2. पब्लिकेशन, प्रथमआवृत्ती 2019
3. डॉ. संह वृंदा , कशोरावस्था समस्या और समाधान ,मंथन पब्लिकेशन जयपुर
4. डॉ. मराठे रमा, असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्व ,मेहता पब्लि शंग हाऊस पुणे २०११
5. डॉ. बोरकर पुरुषोत्तम, मानसशास्त्र मानवी वाढ वकास, पंपळापुरे प्रकाशन 2009
6. परुळेकर आशा ,सुजाण पालकत्व सुंदर बालसंगोपन, उमेश प्रकाशन 1992
7. दैनिक देशोन्नती, लेख सामाजिक संस्थांमधील परिवर्तन आ ण जीवनमान बदलले, मंगळवार 3 जानेवारी 2023